वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अॅन्ड इन्स्टिटयूट ऑफ योग, साऊथ शिवाजीनगर, सांगली-मिरज रोड, ता.मिरज, जि.सांगली

---

आयुर्वेद पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास परवानगी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक.एमईडी १०२०/प्र.क्र.१९१/२०/शिक्षण-२

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

दिनांक:- २० डिसेंबर,२०२१

**संदर्भ:**- १) भारतीय चिकित्सा पध्दति राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.३-३/२०२१-एवाय-(७), दिनांक २३/१०/२०२१.

२) शासन ना हरकत प्रमाणपत्र समक्रमांक दिनांक ०१/०९/२०२१

**प्रस्तावना**:- वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अॅन्ड इन्स्टिटयूट ऑफ योग, साऊथ शिवाजीनगर, सांगली-मिरज रोड, ता.मिरज, जि.सांगली या महाविद्यालयातील बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वाढ करण्यास संदर्भ क्र.२ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. सदर संस्थेस संदर्भ क्र.१ अन्वये भारतीय चिकित्सा पध्दति राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ४० वरुन ६० (EWS सह ५० वरुन ७५) एवढी वाढ करण्यास मान्यता दिली आहे. भारतीय चिकित्सा पध्दति राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मंजुरीनुसार या महाविद्यालयास उक्त पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- भारतीय चिकित्सा पध्दति राष्ट्रीय आयोगाने उपरोक्त संदर्भाधीन पत्र क्र .१ अन्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अॅन्ड इन्स्टिटयूट ऑफ योग, साऊथ शिवाजीनगर,सांगली-मिरज रोड, ता.मिरज, जि.सांगली या महाविद्यालयातील बी.ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची ४० वरुन ६० (EWS सह ५० वरुन ७५) इतकी विद्यार्थी प्रवेशक्षमता वाढ करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१) सदर आयुर्वेद महाविद्यालयातील बी. ए.एम.एस. पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ६० विद्यार्थी (EWS सह ७५)इतकीच राहिल.

२) राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल , त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४) केंद्र शासन, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ (महाराष्ट्र अॅक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) शासकीय किंवा किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्यांच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

७) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे वाढीव जागांकरिता संलग्निकरण प्राप्त झाल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशित करण्यात येऊ नये.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

९) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक राहील.

१०) भारतीय चिकित्सा पध्दति राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संदर्भाधीन क्र.२ मधील पत्रात नमूद अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

३. सदर आदेश हे केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक २३/१०/२०२१ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुरेन्द्र चानकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सचिव, भारत सरकार, आयुर्वेद, योग व प्राकृतिक चिकित्सा, यूनानी, सिध्द एवं होमिओपॅथिक (आयुष) मंत्रालय, आयुष भवन, बी ब्लॉक, जी.पी.ओ.कॉम्प्लेक्स, आई.एन.ए, नवी दिल्ली-११० ०२३.
अध्यक्ष,भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, ६१-६५,इन्स्टिटयूशनल एरिया,जनकपुरी, नवी दिल्ली-११० ०५८.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, आयुष संचालनालय,मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
सचिव,शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
प्राचार्य,वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज ॲन्ड इन्स्टिटयूट ऑफ योग, साऊथ शिवाजीनगर, सांगली-मिरज रोड, ता.मिरज, जि.सांगली-४१६४१६.
अधिष्ठाता, सर्व शासकीय आयुर्वेद महाविद्यालये (आयुष संचालनालयामार्फत)
निवडनस्ती (शिक्षण-२)